


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४९६

REFBK-0024067
REFBK-0024067

# दिल्ली दिल्ली

फ. मुं. शिंदे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७९६
दा. क्र. २७०.६५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य
२८९६
२८०६८
१०।१२।८३

# दिल्ली ते दिल्ली

प्रचलित
राजकारणाचा
उपहास

# दिल्ली
# ते
# दिल्ली

प्रचलित राजकारणाचा उपहास

फ. मुं. शिंदे

परिमल प्रकाशन, औरंगाबाद

प्रकाशक
अनंत दाशरथे
" परिमल " खडकेश्वर
औरंगाबाद ४३१००१.

© प्रा. फ. मुं. शिंदे

प्रथमावृत्ती : सप्टेंबर १९८३

मुखपृष्ठ, आतील चित्रे
खलिल खान, पुणे

किंमत १५ रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे ४११०३०

निर्मळ मनाचा
आणि
सचेत विचाराचा
थोर अभिनेता
श्री. निळू फुले
यांना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९९६
दा. क्र. २००६१०
वगव्य ९०१२५६३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)


REFBK-0024067
REFBK-0024067

श्रेय

श्री. भा. महाबळ
खलिलखान
अनंतराव दाशरथे
एस. बी. वागल
बाबा दळवी
महावीर जोंधळे
चिं. स. लाटकर
साप्ताहिक मनोहर
दैनिक लोकमत
प्रेस कामगार


## कर्तृत्व

मुंबईत का होईना
आपला वंशज
ताठ आहे
पाया पडत नसतो
अशी भाषा तरी
पाठ आहे
म्हणून
शिवाजी महाराजांना
बरे वाटले
परंतु यांची
दिल्लीतली लोटांगणं
पाहून
शिवाजीचे डोळे
फाटले



## पावित्र्य

खुर्चीपासून
सीमेन्टपर्यंत
घोळच घोळ आहे
रात्री अंगघोळ
आणि सकाळी
आंघोळ आहे



## प्रमोशन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

प्याद्याचा
फर्जी होतो
दिल्लीचा दर्जी होतो
दिल्लीचे माप
मुंबईचे टाके
अधांतरी विमानात
खेळतात झोके



## प्रति–निधी

वर वीज कडाडली
की खाली गडगडतं
जाकिटातलं पाकीट
आतल्या आत
धडधडतं



# दिव्याखाली

वर असतो
    लाल दिवा
आत सगळा
    अंधार
डोकी कमी
    टोप्या फार



## सहज

तुम्ही मत देता
ते थुका लावतात
तुम्ही निवडून देता
ते झोका घेतात
सख्ख्या बायकोलाही
ते धोका देतात



# जागा

फुटलेलं
राजकारण
फुलीत जातं
पेटलेलं
राजकारण
चुलीत जातं
उठलेलं
राजकारण
दिल्लीत जातं




## वाढ

गजर धरलं पुढं
की सुरळित
चालतं गाडं
लालची लोकांना
विस्ताराची गुंगी
धोतराच्या नादात
हातची जाते लुंगी



# मंगळ-सूत्र

मधुचंद्राआधीच
घटस्फोट होतो
बसतो न बसतो
तोच खुर्चीत
स्फोट होतो



## खेळणं

दिल्लीनं मुंबईवर
लोकशाही लादली
कचराकुंडीच वाटली
मतांची बादली



## ब्लॅक-मेल

राजकारणातला असो
 की कुटुंबातला
संन्यास
 नुस्तीच थाप आहे
आजकाल कळत नाही
 कोण कुणाचा बाप आहे



## द्रष्टा

पुत्र व्हावा ऐसा
गुंडा
संधी पाहून घोळील
गोंडा



# पुनर्भेट

मतदार भेटतात
　　नेते कटतात
दोघंही पुन्हा
　　जलशात भेटतात
हेही हसतात
　　तेही हसतात
बारीबारीनं
　　तंबूत घुसतात



## संपर्क


सेवक
हात जोडतात
सेवक गोड हसतात
एकदा खुर्चीत
बसले
की मग खुषाल डसतात

दिवसा बापाला
रात्री मुलीला
यांचे बाथरूम
असते
जोडलेले
बाहेरच्या नालीला



## चॅरिटी

लोकशाहीनं
  हक्क दिले
ज्यांनी ते घेतले
  त्यांनीच
  थक्क केले
इतरांना
अंधारात ठेवून
स्वत:चे घर
लखख केले



# अलिबाबा आणि

सावधान
नवी टीम येत आहे
आधीच्यांनी फस्त करून
राहिलेलं खाण्याची
नवी स्कीम येत आहे
सावधान
खातात त्यांचाही
खरोखर इलाज नाही
असं कधी घडलं का
खरूज आहे
पण खाज नाही
सावधान




# कॅबिनेट

तेच चेहरे
तेच मोहरे
आटलेल्या विहिरीत
फुटलेले पोहरे




## पाळी

ह्याला हे दिले
त्याला ते दिले
 कोणाला घेतले
कोणाला काढले
विधवेच्या पोटासारखे
 मंत्रिमंडळ वाढले




# धोरण

जे असतात भोंदीत
तेच पुन्हा यादीत
खुर्चीत चावणारे
ढेकूण बसतात शोधीत
कार्यक्रम
एक कलमी
त्याच त्या गांजासाठी
रोज नव्या नव्या
चिलमी



# काम

नवरा राजकारणी
बायको राजकारणी
दोघांचाही वेळ लागतो
दुसऱ्यासाठी सत्कारणी



# सभ्य

खाऊन खाऊन
राहील
तेवढंच ते देतात
कर्णाच्या औदार्याचं
श्रेय वर घेतात

त्यांच्या कातडीत
असतो
दडलेला गेंडा
त्यांच्याच भीतीनं
फडफडतो झेंडा



# सेवा


पोषाख असो
कोणताही
मनात सत्तेची
भुरळ

खालीवर मिशी
हलवून
टोपीत घुसतं झुरळ



## गुणवत्ता

चांगले असो
    का वाईट
चारित्र्य अट असते
बंगल्याच्या दारालाही
    ठेवलेली फट असते



# हंगामी

कधी वाड्यांची
तर कधी ताटांची
कधी धाकाची
तर कधी नोटांची
मतदाराला गुंगी असते
हंगाम संपला की
पुन्हा तीच तंगी असते




# हप्ता

खुर्चीच्या प्रेमासाठी
लोकांचा
बळी देतात
खालची चड्डी राहावी
म्हणून वर
चोळी देतात



# रामराज्य

मागं एकदा
  शेपटीनं
जाळली होती
  लंका
आजकाल लंकेत
  शेपटी
फक्त हलते
रामालाही सीता
फाडफाड बोलते



# परोपकार

कल्याणाच्या
कामापुढं
बायकोसाठी
नसतो वेळ
स्टेनोशी मात्र
जमतो मेळ
बसल्या बसल्या
खुर्चीत खेळ




# मतलब

पाच वर्षं संपली
की प्रेम वाढते
उमेदवाराला
मतदारसंघाची
नशा चढते
मतदारांची जखम
खूपच सडते




# आहेर

कुणाला मंडळ
　　कुणाला महामंडळ
　　ते वाटत असतात
लग्नातले कोट
　　केव्हा ना केव्हा
　　फाटत असतात




# डबलरोल

खाली चालतं बंड
ठेवून वर निष्ठा
नेम नसतो फिटेल कधी
धोतराचा काष्टा




# फार्स

आलेल्या सत्तेनं
झटका दिला
शहाण्यांचाही जुगार
मटका झाला
काष्ट्याच्या गडबडीत
डोक्यावरचा
पटका गेला




# गुंता

कोण कुठं
    अडकतो
केंव्हा कशाला
    धडकतो
सांगणं अवघड आहे
सिमेंटपेक्षा
    पिशवीच जड आहे.



# भपका

भलत्यांना
भलतीकडचे
तिकीट देणारी
अजब
खिडकी
वरवर गुबगुबीत
बोरं मात्र
आतून किडकी



## संधी


जंगल सोडून
दिल्लीत आलं
माकड
राजकारणावर
बसवली पकड
सोय पाहून
बदलू लागला

भराभर फांद्या
कृष्ण बिचारा
दारावर
खुर्चीत मात्र
पेंद्या



# खुराक

वाघ आले
 सिंह आले
आले धावूनि चित्ते
 असे कसे
 गार झाले
मिळताच भत्ते



# दिल्ली

कोणाचे दिवस
केव्हा भरतील
सांगता येत नाही
टांगलेल्या तलवारीमुळं
कोटाचं फूल देखील
हुंगता येत नाही



## सेल

संपानं मोर्च्यानं
जो गरम होतो
परदेशातल्या
  मधुचंद्रानं
नरम होतो



## लालसा


ते वर जातात
  कधी सरकत
कधी सरपटत
ते खाली येतात
  कधी घरंगळत
कधी फरफटत
कोपर घासो का
  गुडघे
सवय नाही सुटत



## वंशावळ


ढेकणांना झाकणारी
गादी तीच असते
वेळोवेळी बदलते
ती फक्त चादर
कधी तिचा फादर
कधी त्याची मदर

इच्छा असो नसो
गादीला
करावाच लागतो
बुडांचा आदर



# गेंडे

कुणी पक्ष सोडतात
कुणी पक्ष फोडतात
दुसऱ्याचंही जेवण
खुर्चीत बसून झोडतात




# समंध

गादीवर
पडल्या पडल्या
हॉर्नसारखे
घोरतात
भत्त्यासाठी दौरे
झोपेतही करतात



# जनता

शहाण्या मतदारांनी
  सरकार पाडले
मुत्सद्यांनीही
  अखेर
  पायच ओढले
फाइलीवर सगळीकडे
शिवांबु सांडले
दाढीवरून
आपसात भांडले
चर्चेचर्चेत
मुद्यांचे पीठ झाले
लोकांच्या साखरेचे
एकाएकी मीठ झाले



## साधनशुचिता


ज्या कुणाचा
विरोध आहे
त्यांच्यासाठी
निरोध आहे
आतली चर्चा
बाहेर नको
राजकारणाचा
बोध आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.




# खेळी

सुनेने अखेर
थोपटले दंड
लोकांना वाटले
होईल आता बंड
कसचे काय
आणि कसचे
काय
पायात घालून पाय
आपटायचे
हा सासूचा पिंड




# सुपंथ

कधी अंधारात
तर
कधी उजेडात
होत असते
दिलजमाई
पांढऱ्या कापडात
काळी कमाई




## बदल

जुने जातात
नवे येतात
तुटके लगाम
हाती घेतात
रथालाच लागतात
घोड्याच्या टापा
सारथीही योद्ध्यास
मारतो थापा



# शंटिंग

तेच हात
    तेच झटके
त्याच टोप्या
    तेच पटके
पक्षांतरात
    पुन्हा खटके



# अभय

आसन डळमळले
की हात जोडायचे
पाकीट काढायचे
आणि पुन्हा गुपचुप
दार आतून ओढायचे



## कालपरत्वे

बॅरिस्टर वदले
    बंडोबा झाले थंडोबा
कुत्र्यालाही चावतो
    पिसाळलेला खंडोबा



## फेस

कधी कधी असे
तापतात ढिले
हात जोडून उभे
बाटलीपुढे पेले



# अंगभूत

कसला तो पक्ष
जो मुळी फुटत नाही
तोच खरा माणूस
झोपेतून जो उठत नाही




# प्रगती

परा आधी
    कावळा होता
पदा आधी
    कावळा होता
काळ्याचे पांढरे
    करण्यापूर्वी
भलताच सावळा होता




# सौदे

मोर्च्यांना
    कळत नाही
कुठे जावे
बंदला कळत नाही
    काय गावे
सत्ता जाणून
    असते
कोणाला काय हवे



# झोका

बंड जागेसाठी
बंड
खुर्चीसाठी
जमलेच नाही काही
तर पुन्हा एकनिष्ठ
तिखट
मिर्चीसाठी



## प्रीती

वर एकदा ठरले
की समजा
खालचे हरले
त्याच प्रेयसीसाठी
किती प्रियकर झुरले
शेवटी तेही हात जोडतात
ओठातून दात काढतात



# गुंगी

कोणाच्याही
कल्याणाची
खुर्चीत असतो जादू
भगवे कपडे घालून
भोंदू बनती साधू




# युक्ती

पांडवांनी पणाला
द्रौपदी लावली
आजकाल मोठी माणसं
पणाला लावतात
    खुर्च्या
मतदाराला आवडतात
अशाच पोकळ
    चर्चा



# आघाडी

दरडोई वर्गणीची
　　करतात लूट
सांधून घेऊ म्हणतात
　　आपसातली फूट
एकजुटीसाठी
　　निवडणुकीत भेटतात
पांढऱ्या कळपात
　　खुर्चीला खेटतात




# व्यवहार

कुणाची वाढत जाते
श्रीमंती
कुणाचं वैभवशाली
पोट
काळी नोट
गिळते वोट




## सपोर्ट

वर बसला
की
हारतुरे
खाली खेचला
की
विरोधी नारे
गुळाचेच
मुंगळे सारे



## तुकडोजी

काहीजण
  झुंजले
काहींनी फोडल्या
नुसल्याच डरकाळ्या
    कुणाचे पदरावरच
    भागले
 कुणी पळवल्या
    चोळ्या




## दबाव

थोड्यासाठी अडतात
मागं मागं दडतात
धन्याला विचारून
पुन्हा पाया पडतात
  सत्तेला
    तोड नाही
कोण असा नेता
  ज्याला
खोड नाही




## चानस

कधी तरी होते
म्हणे
रामायण घडले
सासऱ्याला म्हणून
सुनेने छेडले
सासरे मोठे चालाख
खुर्चीआड दडले
हळूच पुन्हा
त्याच गादीवर
पडले



# दे दान


शरणार्थींना
मिळेल जागा
चरणार्थींचाच
जुळेल धागा
नाकासकट
कपाळ घासा
आणि वाट्टेल ते
मागा
घोडे किंवा पागा



# धाव

जो येतो तो
    सोडतो
आश्वासनांच्या पुड्या
माकडासारखे आम्ही
    मारतो तिकडं उड्या
त्यांच्यासाठी घालतो
    मतदानाच्या घड्या

ते मोठे अक्कलवान
    ओळखतात
राजकारणाच्या नाड्या
सोयीच्या पक्षाला
लावून बसतात शिड्या



## मध्यावधी

एका वधूसाठी
अनेक असतात वर
सांगायचं कसं
नाव कोणतं नक्की

कोणाचा भरडा
कोणाचं पीठ
करतच असते
दिल्लीची चक्की




## अस्तित्व

एक मारतो दुसऱ्याला
मध्येच आपली टांग
ऐक्याचा फुटतो आरसा
काढताना भांग



# प्लॅनिंग

पाच ठेवा का वीस
कार्यक्रम
कलमी पाह्यजे
निराधार खतम
करण्यासाठी
कार्यकर्ता
इलमी पाह्यजे



# रोल

कायदा आहे
सुव्यवस्था आहे
मायबाप सरकारच्या
मनात
दारिद्र्याची आस्था आहे
दलितांच्या हत्येचा
अहवाल सस्ता आहे
राजकारणाच्या रंगभूमीचा
दिल्लीकडे रस्ता आहे




# स्वभाव

दिवसें दिवस
   वातावरण
बनत आहे जुलमी
म्हणून विरोधीयांनी
चालू केल्या
ऐक्याच्या तालमी
त्यात थोडी फायटिंग
शेवट मात्र फिल्मी



# जीर्णोद्धार

माणसं विकत
घेतली
की मस्त जमते
भट्टी
खाजगी हितासाठी
सार्वजनिक पट्टी




# विधी

मोठ्या झाडाची
सावली मोठी
डोळ्यांतली मात्र
भावली खोटी
सत्कारासाठीच
सजवलेली
शवपेटी




## ऋण

काही तरी निश्चित
नातं आहे
उधारीचं जुनंच
वहीत खातं आहे
कुणी टिपतो
कुणी खपतो



## सेफ

त्यांच्या हातात
चावी आहे
तुमच्या हातात
कुलूप
आणि त्यांनी
बसवले
इज्जतीला लूप



## ऑनरॉक


कमकुवत
ही पार्टी
कमकुवत
ती पार्टी
सर्व पार्ट्यांना
एकच हवी
कॉक-टेल पार्टी



# घरोबा

ज्यांच्या नावामुळं  
इतरच लाजतात  
बोहल्यावर त्यांचे मात्र  
दोन्ही हात खाजतात

त्यांची असते बायको  
खुर्ची आणि सत्ता  
कुठवर पसरला प्रपंच  
त्यांना नसतो पत्ता



## उत्खनन


कधी कधी
  बाई
तर कधी
  बुवा
बनतो असतो दादा
  दादा म्हणतो
  आधी खोदा

मग शोधा
काहीच नाही मिळाले
तर तयार होईल
  खड्डा
ज्याचा त्याचा
  असावा
भुयारात एक अड्डा




## मोहीम

बंडखोरांच्या
शेपटीसाठी
यादीचे वाढीव
नळकांडे
लपवलेले दिसणारच
ताकाचे भांडे



## वरचढ

नवऱ्याला टाळून
बायकोला घ्यावे
जिव्हाळ्यावर रॉकेल
थोडे ओतावे
तरीही दादा
असतील शालीन
हाही इतिहास
कीवकालीन



## सुभेदार

केव्हाही त्यांचे
  बरे असते
तेवढेच त्यांना
  पुरे असते
वाकतात
  ते
टिकतात
हे कधीही
  खरे असते




## करंट

मजूर असो
का हुजूर असो
नेते सर्वांचेच पॉवरफुल
इथून तिथून नागव्यांचे
स्नान तेवढे
शॉवरफूल



# चलती

ज्यांनी फक्त
पाप केले
तेच सर्वांचे
बाप झाले
अमृताचे रखवालदार
पुन्हा एकदा
साप झाले



## मॉडर्न

इमानाला मोल नाही
भावनेला बोल नाही
रत्नाच्या खजिन्याचा
समुद्रही खोल नाही



# पोपट

वातावरण पाहून कुणी
काहीबाही बकतात
आंतड्यांनी नाकारले तर
अन्नही ओकतात
भांडवलाने गिळलेली
क्रान्ती पुन्हा घोकतात




# आयाळ

जनता मेली
तरी चालेल
कोणीच कसा नाही
जो काही बोलेल
वाटले नव्हते सत्तेपुढे
सिंहसुद्धा झुलेल



# तप

आत एक
    बाहेर वेगळे
इथून तिथून
    शिकारी बगळे
औषधाला नाही
    भोळा
असे कसे
    महात्मे सगळे



## उत्सव

वर्गणीची वेळ आहे
पावत्यांचा खेळ आहे
शिळ्या अन्नाची तीच
चवदार भेळ आहे



## समेट

छोट्या पक्षांनी
मोठ्यात घुसावे
त्यांचेच तांदूळ
आपण निसावे
आपल्याच रुमालाने
त्यांचे
प्रसंगी तोंड पुसावे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
काव्य
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0024067
REFBK-0024067

